**प्रेसनोट दिनांकः- २९/०५/२०१९.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर.**

**<u>रिक्षामध्ये हरविलेली पर्स व रोख रक्कम विश्रामबाग पोलीस स्टेशनचे पोलीसाच्या प्रयत्नांमुळे परत मिळाली.</u>**

यांतील रिक्षातुन प्रवास करणा-या प्रवासी सौ.प्रिती परदेशी, वय-४० वर्षे, राहणार-मुकुंद नगर, स्वारगेट,पुणे यांनी दिनांक-२७/०५/२०१९ रोजी सदाशिव पेठेतील गरुड गणपती याठिकाणी जाणेसाठी निघुन त्या भाडोत्री रिक्षामध्ये बसल्या परंतु गरुड गणपती येथे ईच्छीतस्थळी पोहोचल्यानंतर रिक्षेचे भाडे देवुन त्या निघुन गेल्या. त्यानंतर थोडयावेळाने त्यांची खांद्याला अडकविण्याची काळे रंगाची पर्स त्यांतील २८,०००/-रुपये रोख रक्कमेसह व आधारकार्ड, पॅनकार्ड वगैरे महत्वाचे कागदपत्रांसह त्या रिक्षामध्ये विसरल्या असल्याचे त्यांचे लक्षात आले, मात्र तो पर्यंत वरनमुद रिक्षा निघुन गेलेली होती.

वरील घटनेबाबत सौ.प्रिती परदेशी यांनी तात्काळ विश्रामबाग पोलीस ठाणे गाठले व रिक्षामध्ये त्यांची पर्स विसरल्याबाबत पोलीसांना हकिगत कथन केली. सदरवेळी विश्रामबाग पोलीस स्टेशनचे **वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल कलगुटकर यांचे मार्गदर्शखाली तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री. विजय जाधव, पोलीस नाईक श्री. बाबा दांगडे, पोलीस शिपाई संजय बनसोडे, प्रशांत शिंदे** यांनी वरील महिलेस धीर देवुन त्यांचे म्हणणे सविस्तरपणे ऐकुन घेवुन पोलीस ठाण्यातील उपलब्ध CCTV फुटेज बारकाईने पडताळुन पाहुन त्याव्दारे वरील रिक्षेचा क्रमांक हा MH-12-KR-4264 असा असल्याचे निष्पन्न केले. तसेच त्याआधारे कठोर परिश्रम घेवुन नमुद रिक्षेच्या मालकाचा नांव पत्ता शोधुन त्यांचेकरवी सदर रिक्षेवर असलेले चालकाचा नांव,पत्ता श्री.कमल किशोर गुप्ता, वय-५६ वर्षे,राहणार-मंगळवार पेठ,पुणे असे असल्याचे निष्पन्न केले. त्याचप्रमाणे सदर रिक्षा चालक यांना पोलीस ठाण्यामध्ये बोलावुन त्यांचेकडे केलेल्या चौकशीमध्ये पर्स विसरलेल्या वरनमुद महिलेच्या नंतर ३/४ प्रवासी आपले रिक्षेमध्ये बसल्यामुळे सदर पर्स नक्की कोणाची आहे याबाबत माहीती नसलेने त्यांनी ती पर्स त्यांतील रोख रक्कमेसह आपले घरी जपुन ठेवल्याचे निष्पन्न झाले.

अशाप्रकारे सौ. प्रिती परदेशी यांना त्या रिक्षामध्ये विसरुन हरविलेली पर्स, **त्यांतील २८,०००/-रुपये रोख रक्कम व आधारकार्ड, पॅनकार्ड** असे पोलीसांचे उपस्थितीत रिक्षाचालक कमल किशोर गुप्ता यांचे हस्ते सौ. प्रिती परदेशी यांना परत करण्यांत आलेले आहे. सदरवेळी सौ.प्रिती परदेशी यांनी वरील घटनेबाबत पोलीसांनी तात्काळ दखल घेवुन तपासामध्ये घेतलेल्या कठोर परिश्रमांमुळे आपली पर्स व त्यांतील ऐवज परत मिळाल्याचे सांगुन व पोलीसांचे आभार मानुन पोलीस दलाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.


महाराष्ट्र पोलीस